# प्र क र ण प हि ले

## प्रा स्ता वि क

## प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

एकोणीसाव्या शतकात वसाहतवादाला प्रतिकार करण्याचा बचावात्मक मार्ग म्हणून निर्माण झालेल्या राष्ट्रवादाने विसाव्या शतकाच्या मध्यावर आक्रमक रूप धारण करून हा:हा:कार उडवून दिला. विसाव्या शतकाच्या अखेरीस सोविएत युनियनच्या अस्तानंतर विशेषत: आर्थिक क्षेत्रात सुरू झालेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलल्या संदर्भात राष्ट्रवादाच्या औचित्याबद्दल व राष्ट्र राज्यांच्या अस्तित्वाच्या शक्यतेबद्दल प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

याबद्दल वसंत पळशीकर यांनी पुढीलप्रमाणे मार्मिक निरीक्षण नोंदवले आहे, " जागतिक घडामोडींकडे नजर टाकली तर परस्परविरोधी दोन शक्ती एकमेकांशी टक्कर घेताना दिसतात. एका बाजूला राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे तत्त्व टिकून धरणे आतबट्ट्याचे ठरेल की काय अशी शंका उत्पन्न व्हावी, राष्ट्रीय सार्वभौमत्वाला मुरड घालण्याची मनाची तयारी व्हावी अशा घडामोडी जागतिक अर्थव्यवस्थेच्या रंगमंचावर घडत आहेत. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आर्थिक व्यवहार इतके प्रचंड आहेत, त्यांची आर्थिक राजकीय ताकद एवढी मोठी आहे की अनेक राष्ट्रांना त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागत आहे, त्यांच्यापुढे नमावे लागत आहे.

किंवा सार्वभौमत्वाचा मुद्दा बाजूला सारणे हे त्या देशांमधील काही समाजघटकांच्या फायद्याचे ठरत आहे. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, विश्वबँक यासारख्या संस्था / यंत्रणा अनेक राष्ट्रीय सरकारांपेक्षा मातबर बनल्या आहेत. तिसरीकडे आर्थिक सत्ता व लाभ यांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी राष्ट्रे एकत्र येऊन आपले मोठे गट तयार करीत आहेत, आणि स्वतःचे सार्वभौमत्व धोक्यात आणणाऱ्या नव्या साम्राज्यवादी आर्थिक - राजकीय यंत्रणा / रचना यांना जन्म देत आहेत. चौथीकडे, आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार अनेकदा अमेरिकेसारख्या महासत्तांच्याही आवाक्यात रहात नाहीत. राष्ट्रातील पातळीवरील स्वायत्तता व मोकाटपणा प्राप्त व्हावे अशी स्वयंभू ताकद त्यांची आहे. थोडक्यात सार्वभौम राष्ट्रराज्ये स्वतःचे विसर्जन जागतिक पातळीवर अधिक बलवान शक्तींचा, संस्था / यंत्रणांच्या मध्ये करण्यास बाध्य होताना दिसत आहेत."[१]

पुढे आणखी स्पष्टीकरण देताना वसंत पळशीकर म्हणतात " दुसरीकडे संघराज्ये व राष्ट्रे फुटत आहेत. युगोस्लाविया, चेकोस्लोवाकिया यांचे तुकडे झाले. सोविएत संघराज्यात समाविष्ट राष्ट्रे स्वतंत्र झाली. पाकिस्तान, भारत, श्रीलंका या तिन्ही देशांमध्ये फुटून निघू पाहणाऱ्या शक्तींना कसे आवरावयाचे ही बिकट समस्या निर्माण झाली आहे.

कालपरवापर्यंत ज्यांचे अस्तित्व कोणाच्या खिजगणतीतही नव्हते असे आदिवासी लोकसमूह जगभर राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क बजावू पहात आहेत. आफ्रिका खंडातील राष्ट्रांच्या सरहद्दी आणखी किती काळ टिकतील याची शंका आहे." [२]

" आर्थिक शक्ती जगाला एक करू पहात आहेत, एकच सर्वंकष प्रभुत्व असलेली " जागतिक अर्थव्यवस्था " उत्पन्न होत आहे, तर राजकीय शक्ती दीर्घकाळ अस्तित्वात असलेल्या राष्ट्रांचेही तुकडे पाडणार असे दिसत आहे." [३]

राष्ट्रवाद व राष्ट्रराज्य यांच्या सुसंबध्दतेला अशारीतीने आव्हान मिळाले असले तरी भारतीय राजकारणाच्या संदर्भात मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा [ इथून पुढे संघ म्हणून उल्लेख केला आहे] राष्ट्रवादी विचार मध्यवर्ती भूमिका बजावू लागलेला दिसत आहे. संघाचा विचार घेऊन राजकीय क्षेत्रात वावरणाऱ्या भारतीय जनता पक्षाने ११ व्या लोकसभेत सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थान मिळविले आहे. संघ व संबंधित संघटनांबाबत कडव्या समर्थकांच्या व कट्टर विरोधकांच्या वैचारिक भूमिकाच सातत्याने समोर येताना दिसतात. संघाच्या विचारातील कालसुसंगत आशयाचे स्वागत करून कालबाह्य अगर हानीकारक विचार त्याज्य ठरविण्याची समतोल भूमिका अभावानेच घेतली जाते. प्रस्तुत शोधप्रबंधाकेत अशी भूमिका घेण्याचा यथाशक्य प्रयत्न केला आहे.

सध्या जागतिकीकरण वेगाने सुरु आहे. व जग एकमेकांच्या अगदी जवळ येत चालले आहे. याचा अर्थ एकमेकांच्या गळ्येपोटी मानव आंतरराष्ट्रीयवादाचा पुरस्कार करत आहे. म्हणूनच अशी स्थिती असताचा राष्ट्रवाद कितपत प्रत्येक देशात टिकून आहे ? हा एक आता स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल कारण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपमध्ये राष्ट्रराज्यांचा झालेला उदय, १९१४ व १९३९ या कालखंडात लढविली गेलेली जागतिक महायुध्दे, राष्ट्रवादाच्या प्रखर भावनेतून उद्‌भवली. त्यामुळे त्याचे परिणाम त्या त्या राष्ट्रांनीच नव्हे तर संपूर्ण जगाने अनुभवले आहेत.

नवीन जागतिक मुक्त अर्थ व्यवस्था, विज्ञान व तंत्रविज्ञानात प्रगती, दोन महासत्तामध्ये झालेली जगाची विभागणीनंतर सोविएत युनियन अस्तानंतर एकध्रुवी जगाचा उदय या सर्व बाबींचा प्रत्येक राष्ट्रावर परिणाम होतच असतो. म्हणून देशापरत्वे कालमान पाहून राष्ट्रे आपल्या धोरणात बदल करत आहेत. कारण तसा जर बदल केला नाही तर त्या राष्ट्राला अस्मिता टिकवणे अशक्य होईल. म्हणून ती ती राष्ट्रे आपले स्वहित पाहून काही बाबतीत तात्विक तडजोड करताना दिसतात. राष्ट्रवादाची जर वर्चस्ववादाकडे वा विस्तारवादाकडे वाटचाल असेल तर मात्र ते जगाच्या शांततेला धक्का पोहचवेल. कारण प्रथम व द्वितीय महायुध्दे या अतिरेकी राष्ट्रवादामुळेच खेळली गेली.

त्याचा विचार करता आर्थिक साम्राज्यलालसा व इतर देशांच्या बाजारपेठा ताब्यात घेण्याची इच्छा ही सर्वच जगाला वेगळ्या संघर्षात लोटण्यास कारणीभूत ठरेल.

बदलत्या जागतिक व आर्थिक संदर्भात राष्ट्रवाद व राष्ट्र-राज्य ह्या संकल्पनांना तिलांजली देणे, विकसित राष्ट्रांना सोयीचे असले तरी भारतासारख्या अर्धविकसित राष्ट्राला मात्र नव्या आर्थिक वसाहतवादापासून व विकसित राष्ट्रांच्या सांस्कृतिक प्रभावापासून स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी राष्ट्रवादाचा अवलंब रणनीतीच्या पातळीवर तरी करावा लागेल असे वाटते.

संघाचा राष्ट्रवाद या संदर्भात काही भूमिका बजावू शकतो का ? संघाच्या विचारात ह्या देशातील विविध जाती उपासना पंथ व विविध भाषांच्या लोकांना सामावून घेऊन राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत योगदान देण्याचे सामर्थ्य आहे का ? याचे चिकित्सक मूल्यमापन होणे आवश्यक आहे. भारताचे एक राष्ट्र म्हणून अस्तित्व किती प्राचीन आहे, याबद्दल वेगवेगळी मते आढळतात. त्यापैकी एक मत, ब्रिटीशांच्या आगमनानंतरच भारत एक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले असे आहे.

" नेशन बिल्डिंग इन इंडिया " या पुस्तकातील प्रस्तावनेत संपादक ब्रह्मानंद म्हणतात, .. " भारत कधीच राष्ट्र नव्हते व आजही नाही. हा घटक आजही अस्तित्वात असल्याचे आढळत नाही. फ्रेंच राज्यक्रांती व औद्योगिक क्रांतीने ज्या मूल्य व्यवस्थेला जन्म दिला. त्यामुळे सत्ता व सार्वभौमत्वासंबंधीच्या सगळ्या धारणाच बदलून गेल्या. भारत आणखी एका क्रांतीच्या उंबरठ्यावर आहे. देशाची केवळ भौगोलिक अखंडता राष्ट्र म्हणून सिद्ध होण्यास पुरेशी नाही. भारताला अजून बरीच मोठी मजल मारायची आहे. भावनिक एकात्मता साधणे हे सर्वात महत्वाचे आहे. केवळ राष्ट्र राज्य म्हणून मान्यता, हे ह्यासाठी पुरेसे नाही." [४] दुस-या मतानुसार भारत प्राचीन काळापासूनच एक राष्ट्र म्हणून विदयमान होते. संघाची भूमिका दुस-या प्रकारात मोडते. ह्या भूमिकेचे परीक्षण करणे ही स्थाच्या संदर्भात उपयुक्त ठरेल असे वाटते.

भारतात झालेली राष्ट्रवादाची मांडणी एकसुरी वा साचेबंद नाही. काँग्रेसचा हिंदीराष्ट्रवाद, सावरकरांचा हिंदुराष्ट्रवाद अरविंदाचा सांस्कृतिक राष्ट्रवाद, संघाचा हिंदु राष्ट्रवाद अशा अनेक छटा त्यात आढळतात. काँग्रेसच्या हिंदी राष्ट्रवादाने या देशात जन्मलेले सर्व आपोआपच देशातील राष्ट्रीय लोक होत अशी भूमिका घेतली. या देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्याची इच्छा, या सर्वांना एकत्र बांधून ठेवण्यास पुरेशी आहे असे काँग्रेसने मानले. मात्र ब्रिटीश साम्राज्यवादास विरोध या काहीशा नकारात्मक पायावर

काँग्रेसचा हिंदी राष्ट्रवाद उभा असल्याने त्याचा पाया ठिसूळ राहिला. मुळात परकीय सत्तेस विरोध करण्याची इच्छा प्रत्येक भारतीयाच्या मनात आहेच हे गृहित धरण्याची चूकही या भूमिकेत घडली. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्य प्राप्तीच्या इच्छेचा कच्चा दुवाही कालबाह्य ठरला. सर्वांना जोडणाऱ्या "स्वातंत्र्यप्राप्तीची इच्छा" ह्या समान धाग्याच्या जागी "सर्वांच्या समान आकांक्षा" हा दुवा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न पुरेसा यशस्वी झाला नाही मुख्यत: मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी झटणे ह्या ध्येयामध्ये असलेले भावनिक आवाहन, "विकासाबाबतच्या समान आकांक्षा" ह्या सारख्या व्यावहारिक गोष्टीला नव्हते. प्रा.स.ह. देशपांडे यांनी "हू इज अॅन इंडियन नॅशनल" ह्या आपल्या लेखात हिंदी राष्ट्रवादाची समीक्षा केली आहे. "हिंदी राष्ट्रवादाने संस्कृतीच्या संकल्पनेपासून पूर्ण फारकत घेतली नसली तरी ही संकल्पना मध्यवर्तीही मानली नाही. विशेषत: संस्कृतीत कोणत्या गोष्टी अभिप्रेत आहेत ह्याबद्दलची पुरेशी सुस्पष्ट मांडणी केली गेली नाही. उदा.जवाहरलाल नेहरूंनी हिंदूंच्या गत इतिहासात खोलवर जाऊन त्याबद्दल अभिमानाची भूमिका बाळगली तर अगदी विरोधी भूमिका घेऊन अबुल कलम आझादांनी मुस्लीम येण्यापूर्वीचा सांस्कृतिक इतिहास गैरलागू ठरविला व इस्लामच्या आगमनानंतर इस्लाममुळे झालेल्या सांस्कृतिक देवाणघेवाणीवर भर दिला..

संपूर्ण भारतीयांना घट्टपणे एका धारणशक्तीत अशा तत्त्वांचा शोध घेण्याचा गंभीर प्रयत्न कधी झालाच नाही. उलट सर्वधर्म मुळात सारखेच आहेत अशा प्रकारच्या विचाराने विविध धर्माच्या लोकांमध्ये सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला गेला. आणि दुसऱ्या बाजूला एकाचवेळी विविध धर्माच्या लोकांचा अनुनय करण्याचे किंवा आवश्यक वाटल्यास एका धर्माच्या विरोधात दुसऱ्याचा अनुनय करण्याचे धोरण तात्कालिक राजकीय गरजांनुसार अवलंबले गेले अशा परिस्थितीत भाविकाकडे निर्देश करण्याचे सामर्थ्य ह्या गोंधळलेल्या विचारांत असणे शक्यच नव्हते. मतपेट्यांच्या राजकारणाने ही परिस्थिती पुढे आणखीनच बिघडवली. आपली राज्यघटना पूर्णत: निधर्मी नाही ही वस्तुस्थिती असली तरी राज्यघटनेत आहे तेवढीही निधार्मिकता व्यवहारात उतरविली गेली नाही." [५]

" सर्वांना एकत्र जोडून ठेवणाऱ्या तत्त्वाअभावी हिंदी राष्ट्रवादाची संकल्पना भौगोलिक राष्ट्रवादापुरती मर्यादित राहिली. एका निश्चित भूप्रदेशात वास्तव्य करणारे ते सर्व राष्ट्रीय इतका जुजबी अर्थ " भारतीयत्व " किंवा "भारतीय अस्मितेला" प्राप्त झाला. ह्या संकल्पनेत कुठलेच चैतन्य नव्हते. त्यामुळे तिचे अपयशही निश्चित होते. आपण सध्या पाहात असलेल्या विघटनवादाचे मूळ हिंदी राष्ट्रवादाच्या संकल्पनेकडे पाहताना थोडी सहानुभूतीची ही दृष्टी ठेवली पाहिजे. कारण बहुभाषिक, बहुवंशीय, बहुधार्मिक व

विविध संस्कृतींचा संगम असणाऱ्या देशात सर्वांना जोडणारे समान सूत्र शोधणे ही खूपच अवघड गोष्ट आहे."[6] अनेक विचारवंतांनी व अभ्यासकांनी भारताच्या विविधतेतील एकतेबद्दल पुष्कळ लिहिले, बोलले असले तरी ही एकता नेमकी कोणत्या रीतीने अनुभवास येते किंवा व्यक्त होते ते, सुस्पष्टपणे सांगणे त्यांना शक्य झालेले नाही अशा परिस्थितीत एकात्मतेला प्रोत्साहन देऊ शकणाऱ्या मूल्यांचा शोध घेणे ही तातडीची गरज आहे. अशी तत्वे कोणती ती आपण सांगू शकतो असा दावा करणाऱ्या संघपरिवाराने मांडलेल्या सांस्कृतिक राष्ट्रवादाची ह्या संदर्भात चिकित्सा होणे आवश्यक आहे.

" संघ परिवाराच्या केंद्रस्थानी असलेला किंबहुना त्याचा मूळ स्त्रोत असलेला त्यांचा रा.स्वं.संघ इ.स.१९२५ च्या विजया दशमीस स्थापन झाला. डॉ.केशव बळीराम हेडगेवार हे रा.स्वं.संघाचे संस्थापक-सरसंघसंचालक होते. आजमितीस संघाचे ३५ लाखाहून जास्त सभासद आहेत व ३००० पेक्षा जास्त प्रचारक आहेत. संघ परिवारातील अखिल भारतीय विदयार्थी परिषद, या संघटनेचे सुमारे १५ लाख सभासद आहेत. तर भारतीय मजदूर संघाचे ३० लाख कामगार व कर्मचारी सभासद आहेत. सुमारे २४०० कामगार संघटना भारतीय मजदूर संघाशी संलग्न आहेत. वनवासी कल्याण आश्रमाच्या शाखा ३१००० आदिवासी वस्त्यांत पोचलेल्या आहेत. सेवा भारती च्या संघटनेचे १०,००० सेवा प्रकल्प आहेत तर विदया भारतीशी संलग्न शिक्षण संस्थातून १२ लाख विदयार्थी शिक्षण घेत आहेत. व ४०,००० शिक्षक काम करीत आहेत.

विश्व हिंदु परिषद ही जागतिक संघटना देशोदेशी पसरली आहे. एकट्या महाराष्ट्रात परिषदेची ४०० केंद्रे, ४ लाख अनुयायी व १०० पूर्णवेळ कार्यकर्ते कार्यरत आहेत. विश्व हिंदुपरिषदेतर्फे १६० विकास प्रकल्प महाराष्ट्र राज्यात राबविले जात आहेत. याशिवाय संघाशी संबंधित भारतीय जनता पक्षाचा ११ व्या लोकसभेत १६१ खासदारांच्या माध्यमातून लोकसभेतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय झाला आहे. दिल्ली, गुजरात, राजस्थान व महाराष्ट्र येथे सत्तारुढ असलेल्या ह्या पक्षाने यापूर्वी हिमाचलप्रदेश, उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश येथेही सत्तेत सहभाग मिळविला आहे."[७]

संघाने मांडलेला हिंदु राष्ट्रवाद गेल्या काही काळात विशेषत: ६ डिसेंबर १९९२ नंतर खूपच वादग्रस्त विषय बनला आहे. हिंदुत्व विचाराची मांडणी मात्र संघाच्या स्थापनेच्या पूर्वीपासूनच केली गेली आहे. "हिंदुत्व विचाराचा जन्म राष्ट्रीय सभेच्या[काँग्रेसच्या] पोटातच झाला आहे. महात्मा फुलेंनी राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनावर १८८९ साली मोर्चा नेऊन सांगितले की, ही सभा केवळ उच्चजातीयांच्या व विशेषत: ब्राह्मणांच्या हितासाठीच आहे. पुढे काँग्रेसचे नेतृत्व टिळकांकडे आल्यावर त्यांनी वेदांती तत्वज्ञानाचे अधिष्ठान देऊन काँग्रेसची हिंदुत्ववादी चौकट अधिकृत केली. ब्रिटिश राजवट घालवल्यानंतर काँग्रेसला येथे पेशवाई आणायची आहे अशी सत्यशोधक व ब्राह्मणेतर सुधारकांची ही समजूत होती.

समाजसुधारकांना विरोध, कायदेमंडळात मराठा, माळी, तांबोळी आदि ब्राह्मणेतरांना येऊ देण्यास मज्जाव, अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ देण्यास विरोध, नवबौद्धांना राखीव जागा आदी घटनात्मक सवलतींपासून वंचित ठेवणे, हिंदुकोड बिलाला विरोध आदी ठळक उदाहरणे पाहिली तर एक गोष्ट स्पष्ट होते की, काँग्रेसने तिच्या जन्मापासून उच्चजातीयांचे हितसंबंध जोपासण्यासाठी व कनिष्ठ जातीयांच्या चळवळी दडपून टाकण्यासाठी हिंदुत्व विचार प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अंमलात आणलेला आहे. गांधींचा हिंदुत्व विचार मुसलमानांचा अनुनय करणारा मवाळ वाटला म्हणून डॉ.हेडगेवारांनी कट्टर हिंदुत्ववादी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन केला. त्याआधी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'हिंदुत्व' ह्या ग्रंथात हिंदुत्वाची संकल्पना मांडलेली होतीच."[८]

" हिंदुत्ववाद्यांनी आक्रमक हिंदुत्व हा राष्ट्रवादाचा आधार मानून चातुर्वर्ण्य व्यवस्थे अंतर्गत सर्व जातीमध्ये एकी प्रस्थापित करणे व हिंदु परंपरेचा अभिमानी असा सामर्थ्यवान समाज निर्माण करणे हे ध्येय समोर ठेवले आहे. गोळवलकर गुरुजींचा पारंपरिक हिंदुत्ववाद, सावरकरांचा नवहिंदुत्ववाद असा फरक करता येतो. बाळासाहेब देवरस सरसंघचालक झाल्यापासून १९७३ मध्ये कनिष्ठ जातींना बरोबर घेऊन राजकिय हस्तक्षेप करण्याची नवहिंदुत्ववादी भूमिका संघपरिवाराने घेतली आहे.

हिंदुधर्माची रचना, एकाधिकारशाहीला साथ देणारी नाही, ह्याचे हिंदुत्ववादयांना मनापासून वाईट वाटत असावे. हिंदुधर्म हा संघटित धर्म नाही त्याच्यामध्ये अंतिम अधिकार असलेले केंद्र नाही, धर्मगुरूंची उतरंड नाही, उपपंथ, जाती, उपजाती, यांच्यामध्ये विभागलेला अनेक उपासना पध्दती असलेला स्वायत्त गटांचे कडबोळे असलेला हा समाज असल्यामुळे एकछत्री हिंदुत्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात अडथळे निर्माण होतात. पारंपरिक एकछत्री संघटनां नाहीत म्हणून त्यांनी विहिंप सारख्या संघटना बांधलेल्या आहेत."[१]

संघावर वरील प्रमाणे आरोप होत असले तरी संघाचे हिंदुत्व ही सांस्कृतिक संकल्पना असून त्याचा कोणत्याही उपासना पंथाशी संबंध नाही असा संघाचा दावा राहिलेला आहे. संघाचे माजी सरसंघचालक बाळासाहेब देवरस म्हणतात, " हिंदू या शब्दाने एखादया धार्मिक संप्रदायांचा किंवा भौगोलिक मर्यादांचा बोध होत नाही. तो शब्द अनेक शतके घडलेल्या क्रिया प्रतिक्रियांमुळे समृध्द झालेल्या एका सांस्कृतिक प्रवाहाचे प्रतीक आहे." संघाचे बौध्दिक प्रमुख मा.गो.वैदय म्हणतात, संघ सावरकरांच्या हिंदु शब्दांच्या व्याख्येच्या आणखी पुढे गेला आहे. ज्याची ज्याची पुण्यभू भारताबाहेर आहे तो हिंदू नाही असे सावरकरांनी म्हटले आहे संघाच्या व्याख्येत मात्र

जो जो ह्या देशाचा इतिहास, परंपरा व संस्कृती मानतो , ह्या देशाला जो आपली मातृभूमी समजतो अशा सर्वांचा अंतर्भाव होतो. मग त्यांची उपासना पद्धत इस्लामी असो किंवा ख्रिस्ती. संघाचे सरकार्यवाह एच. व्ही. शेषाद्री म्हणतात, संघाच्या दृष्टिकोनाप्रमाणे हिंदु या शब्दात भारताचे राष्ट्रीय व्यक्तिमत्व सूचविले जाते. जी व्यक्ति या राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होईल ती हिंदू."[१०]

संघाच्या वरील विचारांच्या प्रकाशात संघाची राष्ट्रवादाची संकल्पना तपासून पाहायला हवी संघाची हिंदू शब्दाची व्याख्या एका अर्थाने हिंदी राष्ट्रवादाच्या संकल्पनेला त्यात नसणारा भावनिक व सांस्कृतिक आशय प्राप्त करून देऊ शकते. राष्ट्रवाद संस्कृतीत रूजलेला असल्याचा आग्रह ही स्वाभाविक आहे. राष्ट्रवादाची भावना निर्माण होण्यासाठी देशाप्रती प्रेम व निष्ठा निर्माण होणे आवश्यक असते ह्या देशाशी आपले नाते आहे, असे मानल्याखेरीज हे प्रेम निर्माण होऊ शकत नाही आपले मान हिंदू भूतकाळाबद्दलच्या आपल्या स्मृती आपल्या इच्छा, आकांक्षा व सुखदुःखे ही एकच आहेत या जाणीवेतून देशवासियांचे परस्परांशी नाते दृढ होऊ शकते. देशाचा सांस्कृतिक इतिहास ह्यासाठी महत्वाचा ठरतो. येथील सांस्कृतिक प्रवाहाशी एकरूप होऊन जाणे आवश्यक असले तरी संघ वापरत असलेली सांस्कृतिक

प्रीतके ही प्रामुख्याने हिंदु धर्माशी संबंधित प्रतीके आहेत.
ही गोष्ट पुन्हा पुन्हा जाणवत राहते. संघाची धर्मनिरपेक्षते बाबतची भूमिका ही अशीच संदिग्ध आहे. संघ धार्मिक राज्याचा [ थिओक्रॅटिक स्टेट ] स्पष्ट शब्दात विरोध करतो. पण धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार मात्र करत नाही. किंबहुना " सर्वधर्मसमभाव " हीच संकल्पना संघ आदर्शभूत मानतो असे दिसते. संघाच्या एकूण विचारात व्यक्तीपेक्षा समाजाच्या हिताला प्राधान्य देण्यात आले आहे ह्या दोहोत अंतर्विरोध नाही अशीही मांडणी केली आहे. संघाला संमिश्र संस्कृती हा शब्दप्रयोग मान्य नाही. संस्कृती ही एकात्मच असते असा संघाचा दावा आहे. वेदीतील संस्कृतीत भर घालत त्याच्याशी एकरूप झालेले अन्य संस्कृतीचे प्रवाह संघाने वापरलेल्या प्रतीकांमधून आविष्कृत होताना मात्र दिसत नाहीत. पाश्चात्य संस्कृतीत जडवादी ठरवून भारतीय संस्कृतीच्या अध्यात्मिक पायावर संघाचा भर दिला आहे. पारलौकिकाकडे डोळे लावून बसताना ऐहिक गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा आपल्या संस्कृतीतील दोष संघाने काहीसा नजरेआड केला आहे. असे म्हणायला वाव आहे." [११]

संघ विचारातील राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रबांधणी यासंदर्भात मांडणीचे चिकित्सक परीक्षण करून प्रचलित संदर्भात सुसंबद्धता आहे किंवा नाही याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे. ह्या संशोधनात ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचाच अवलंब केला आहे. ह्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रारंभी राष्ट्र, राष्ट्रवाद आणि राष्ट्रबांधणी याबाबतचे राज्यशास्त्रीय विवेचन करणारे साहित्य अभ्यासणे तसेच संघ व संघसंलग्न संघटनांचे साहित्य, संघविरोधकांचे साहित्य व संघ विचारांबाबतचे संशोधनपर लेखन यांचा आधार घेतला आहे.

कोणत्याही संशोधन संस्थेचे आर्थिक पाठबळ लाभले नसता एका मोठ्या विषयाला हात घालणे ही तशी अवघड गोष्ट होती. त्यातही एम.फिल. पदवीसाठी हा विषय निवडीत असल्यामुळे एका ठराविक काळात शोध प्रबंधिका सादर करण्याची मर्यादाही ह्या अभ्यासाला पडली आहे. परगांवच्या ग्रंथालयामध्ये संदर्भ मिळविण्यासाठी जाणे अशक्य असणे, आणि आजवरचे शिक्षण मराठी माध्यमातून झाल्यामुळे, इंग्रजी भाषेतील पुस्तके समजून घेण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागणे, ह्यातूनही या अभ्यासावर मर्यादा पडल्या. प्रबंधिका सादर झाल्यानंतरही माझ्या पुढच्या अभ्यासात या उणीवा दूर करण्याचा प्रयत्न करेन. शोधप्रबंधिकेचा विषय निश्चित झाल्यावर आलेले काही अनुभवही ह्या निमित्ताने नमूद करण्याचा उपयोग होईल असे वाटते. शिवाजी विद्यापीठात ह्या संशोधन विषयाची निवड

करण्यापेक्षा दक्षिण महाराष्ट्रात ज्या विचारांना अधिक महत्व किंबहुना सन्मानही लाभला आहे असा विषय निवडणे "शहाणपणाचे" ठरले असते, असा सल्लाही अनेकांनी दिला. संघावर संशोधन करतो म्हणजे, मी संघाचा कार्यकर्ता असेन असा गैरसमजही काहींनी करून घेतला व स्पष्टपणे माझ्यापुढे प्रकट ही केला. वस्तुतः संशोधनासाठी कोणताच विषय अस्पर्श मानला जाण्याची गरज नाही. आपले व्यक्तिगत विचार कोणते आहेत, त्यानुसार आपण कोणत्या विषयावर संशोधन करायचे यावर मर्यादा पडली पाहिजे असे नाही. वेगवेगळी राजकिय घटिते जर आपल्याला विचारासाठी प्रवृत्त करीत असतील तर असे कोणतेही राजकीय घटित संशोधनासाठी निवडण्यात अडचण येण्याचे कारण नाही.

या शोधप्रबंधाची रचना चार प्रकरणात केली असून त्यामध्ये प्रास्ताविक, राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी या संकल्पनांचे स्पष्टीकरण व संघ तत्वज्ञानातील राष्ट्र, राष्ट्रवाद व राष्ट्रबांधणी संबंधी विचार व त्यावर संघ विरोधकांची टीका व शेवटी निष्कर्षाचे प्रकरण यांचा समावेश आहे.

## प्रकरण पहिले

### संदर्भ


१] वसंत पळशीकर , "स्वदेशीनिष्ठ समुदाय : गांधीचा राज्यविषयक विचार" " साम्ययोग " १६ ऑक्टोबर १९९२, पृ. १७

२] कित्ता

३] कित्ता

४] ब्रह्मानंद [ फोरवर्ड ] , " नेशन बिल्डिंग इन इंडिया "

५] प्रा.स.ह.देशपांडे , " हू इज ॲन इंडियन नॅशनल " [ अप्रकाशित लेख ], पृ.१

६] कित्ता, पृ.२

७] राजेंद्र व्होरा , " हिंदुत्ववादाचे नवफॅसिस्ट स्वरूप " , समाज प्रबोधन पत्रिका, पृ.४

८] श्रावण देवरे , " सर्वंकष हिंदुत्वविचार वर्चस्व आणि मांडलिक बहुजन विचार ", समाजप्रबोधनपत्रिका, पृ.१५३ - १५४.

९] राजेंद्र व्होरा, उपरोक्त, पृ.३

१०] स.ह.देशपांडे , " सावरकर ते भाजप - हिंदुत्वविचारांचा चिकित्सक आलेख ", पृ. १५१

११] स. ह. देशपांडे , " हू इज ॲन इंडियन नॅशनल " पृ. ४ - ६